# देगलूर महाविद्यालयास आमदार विक्रम काळे यांच्याकडून ग्रंथभेट

देगलूर- येथील देगलुर महाविद्यालयास छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे यांनी देगलूर महाविद्यालयाला ग्रंथ भेट दिली आहे.

याप्रसंगी अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या वतीने कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार, रवींद्र द्याडे, गोविंदप्रसाद झंवर, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. एम. एम. चमकुडे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील व जुक्टा संघटनेच्या वतीने प्रा. एम. एम. चमकुडे, डॉ. व्यंकट शेरीकर, प्रा. संतोष वानोळे आदींनी आमदार विक्रम काळे यांचा सत्कार केला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी आमदार विक्रम काळे यांच्या संसदीय कार्यावर प्रकाश टाकला. नव्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम व पायाभूत सेवा सुविधा यात तंत्रज्ञानाचा वाढता सहभाग विचारात घेता आ. विक्रम काळे यांनी आमदार निधीतून महाविद्यालयास संगणकाचे १० संच द्यावेत असे निवेदन दिले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner